## मुंबई विद्यापीठ

क्र. वि.क./ ५३४/ २००३
दिनांक २९ नोव्हेंबर, २००३

परिपत्रक :

संचालक /विविध विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, प्राचार्य, सर. ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, प्राचार्य / संचालक मान्यता प्राप्त पदव्युत्तर संस्था आणि प्राचार्य कला, वाणिज्य, विज्ञान विधी अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, व वास्तुशास्त्र महाविद्यालये/संस्था तसेच उपकुलसचिव आस्थापना विभाग, उपकुलसचिव शिक्षक नियुक्ती विभाग व उपकुलसचिव संलग्नता घटक महाविद्यालये विभाग यांना माहिती व योग्यत्या कार्यवाहीसाठी रवाना.

कुलसचिवांकरिता,

---

महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकीर्ण २००२/[१०५]/विशि-४.
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२,
दिनांक - २९ ऑक्टोबर, २००३.

प्रति,
सर्व विद्यापीठाचे कुलसचिव, मुंबई
महाराष्ट्र राज्य,

विषय -: <u>सेवाप्रवेश नियम</u>
पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून नियम संदर्भित / सेवेत श्रेणीत किमान सेवेसंबंधीची अट मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी शिथिल करणेबाबत.

महोदय,

सोबत सामान्य प्रशासन विभागाचे क्रमांक एसआरव्ही २००३ /सीआर १८/२००३/१२, दिनांक २२ सप्टेंबर २००३ ची प्रत सोबत जोडली आहे.

सदरहू परिपत्रकातील निदेशानुसार मागासवर्गीयांच्या पदोन्नतीच्या कोटयातील अनुशेष भरुन काढण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.

आपला

सही/-
[वि. गो. दळवी]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,-.
१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

सेवा प्रवेश नियम -

पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात/सेवेत/श्रेणीत किमान सेवेसंबंधीची अट मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढण्यासाठी शिथिल करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक: एसआरव्ही-२००३/सीआर-१८/२००३/१२.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २२ सप्टेंबर, २००३.

वाचा :- १] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८८/१०९/१२, दिनांक २५ ऑगस्ट, १९८८.

२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८८/१०९/ प्र. क्र. १/८८/१२, दिनांक ४ सप्टेंबर, १९९०

## प रि प त्र क

वर नमूद केलेल्या शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८८/१०९/१२, दिनांक २५/८/१९८८ आणि शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८८/१०९/प्र.क.१/८८/१२, दिनांक ४/९/९० अन्वये गट-क [वर्ग-३] पासून गट-अ [वर्ग-१] मधील दुसऱ्या टप्प्यावरील पदोन्नतीपर्यंतच्या पदावर आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नत्या देताना पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून निकटतम निम्न पदावर किमान ३ वर्षांच्या सेवेची अट विहित करण्यात आलेली आहे. सध्या राज्यातील सर्व शासकीय/निम शासकीय सेवेतील मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरून काढण्याची मोहिम हाती घेण्यात आलेली आहे. पदोन्नतीमधील अनुशेष भरून काढण्याकरिता काही संवर्गात पदोन्नत्या देण्याकरिता निम्न संवर्गात ३ वर्षांची सेवा झालेले मागासवर्गीय कर्मचारी उपलब्ध होत नाहीत, असे शासनास आढळून आलेले आहे. त्यामुळे अनुशेष भरण्याच्या मोहिमेत बाधा उत्पन्न होत आहे. सदर बाधा दूर करण्याकरिता पदोन्नतीच्या कोट्यातील मागासवर्गीयांची अनुशेषाची पदे भरण्याकरिता केवळ मागासवर्गीय कर्मचाऱ्यांकरिता निम्न पदावरील ३ वर्षांच्या अनुभवाचा कालावधी शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. याबाबत सर्वकष विचार करून शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, मागासवर्गीयांचा पदोन्नतीचा कोट्यातील अनुशेष भरून काढण्याकरिता गट-क [वर्ग-३] पासून गट-अ [वर्ग-१] च्या पदावर आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर विहित केलेला सेवेचा ३ वर्षांचा कालावधी खालील अटींच्या अधीन राहून शिथिल करून तो २ वर्षांचा करण्यात येत आहे :-

[कृ.मा.प...

१] त्यांची पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात राहिल व वरिष्ठ संवर्गात जेष्ठतेसाठी ग्राहय धरता येणार नाही. त्या संवर्गात वेतनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही लाभ मिळणार नाहीत.

२] अशी पदोन्नती केवळ ११ महिन्यासाठी देण्यात यावी. त्यानंतर त्यांना पदोन्नती मध्ये खंड देण्यात यावा.

३] या ११ महिन्याच्या कालावधीत कनिष्ठ श्रेणीत ३ वर्षे पूर्ण झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची पदोन्नतीसाठी पात्रता पुन्हा अजमाविण्यात यावी.

३] सदर सवलत केवळ अनुशेषाची विशेष भरती मोहिम सुरु असेपर्यन्तच अनुज्ञेय राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
[प्र. कृ. लोखंडे]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
प्रबंधक, अपील शाखा, उच्चच न्यायालय, मुंबई,
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय [विधानसभा] मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय [विधानपरिषद] मुंबई,
राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
सचिव, अनुसूचित जमाती कल्याण समिती, विधान भवन, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र - १ [लेखा व परीक्षा ],महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र - २ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र - २ [लेखा परीक्षा ], महाराष्ट्र, नागपूर,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई [दोन प्रती]
महालेखापाल, महाराष्ट्र - १ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र मुंबई,

[कृ.मा.प...

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती,

पत्राने.